पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अमरावती ■ वर्ष १ ■ अंक ६१ ■ शनिवार दि. २५ जुलै २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ४

■ RNI No.- MHAR/26/A2977 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




## »थोडक्यात

### पेपरफुटी प्रकरण; बिजेंद्र गुप्ताला बिहारमधून अटक

मुंबई : टीईटीच्या पेपरफुटी प्रकरणात एक मोठी अपडेट समोर आली आहे. टीईटी पेपर फुटी प्रकरणातील मुख्य आरोपा बीजेंदर कुमार गुप्ता याला बिहारमधून पोलिसांनी अटक केली आहे. या मुख्यसूत्रधार आरोपीला पोलिसांनी बिहारमधून मुंबई आणि नंतर भिवंडी येथे आणण्यात येत आहे. या प्रकरणी आतापर्यंत या १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर याआधी १२ आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यानंतर पोलिसांनी मोठी कारवाई करत यातील फरार मुख्य आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहे.

### मी देवेंद्रजींना महाराष्ट्रातच ठेवणार – अमृता फडणवीस

पंढरपूर : गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भाजपचे केंद्रीय नेतृत्व दिल्लीत बोलावून घेणार, अशी जोरदार चर्चा सुरु आहे. देवेंद्र फडणवीस दिल्लीत केंद्रीय मंत्री होणार, अशा चर्चाही सातत्याने सुरु आहेत. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांना विचारणा केली असता त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. नाही, आम्हाला, मला महाराष्ट्रातच राहायचं आहे. मी देवेंद्रजींना महाराष्ट्रातच ठेवणार, असे अमृता फडणवीस यांनी म्हटले. त्या शुक्रवारी पंढरपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या.

### नाशिक, पालघरमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के!

नाशिक : नाशिक आणि पालघर या जिल्ह्यांमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के जाणवल्याने नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यात शनिवारी सकाळी एकापाठोपाठ चार धक्के बसले, तर पालघर जिल्ह्यातही भूकंपाचे सत्र कायम असल्याचे पाहायला मिळाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा वित्तहानी झालेली नाही, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील बोरगाव आणि आसपासच्या परिसरात आज सकाळी ९.५५ वाजल्यापासून भूकंपाचे चार सौम्य धक्के जाणवले. या धक्क्यांची तीव्रता रिश्टर स्केलवर ३.६ नोंदवली गेली आहे. एकापाठोपाठ एक अशा चार वेळा जमिनीला हादरे बसल्यामुळे बोरगाव परिसरातील ग्रामस्थ आणि नागरिक घराबाहेर पडले.

# पडीक वार्डातील सफाई कामात भ्रष्टाचाराची पायाभरणी सुरु!

## पडीकच्या 65 कोटींच्या सफाई कामाच्या निविदा अडचणीत

प्रतिनिधी २५ जुलै

अकोला : अकोला महानगरपालिकेत लोकशाही व्यवस्था, कायदा आणि नियमांचे धिंडवडे उडवणारा एक खळबळजनक प्रकार समोर आला आहे. महासभेचे कायदेशीर अधिकार डावलून प्रशासनाने मनमानी कारभार करत काढलेली स्वच्छता निविदा म्हणजे 'महासभेच्या अधिकारांवर थेट गदा' असल्याचा अत्यंत गंभीर आरोप करण्यात आला आहे. २४ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली ही विवादित निविदा तात्काळ रद्द न केल्यास राज्य शासन, नगरविकास विभाग आणि थेट न्यायालयात खेचण्याचा थेट इशारा प्रशासनाला देण्यात आला आहे. विविध प्रभागाच्या ५१ प्रतिभागांसाठी १६ फेब्रुवारीला मंजुरी देण्यात आली. पण, मुळात प्रशासनाने ५५ प्रतिभाग नुसार लहान लहान टेंडर काढण्याची तयारी सुरु केल्याची माहिती आहे. महिन्याला सव्वा कोटी आणि वर्षाला १३ ते १४ कोटींचे हे कामे असून यासाठी महापालिकेने नियम धाब्यावर बसविल्याचे चित्र आहे. पाच वर्षासाठी असलेल्या ६५ कोटींच्या या सफाई कामाच्या निविदांमध्ये भ्रष्टाचाराच्या धुळीची पेरणी सुरु झाली आहे.

**महासभेच्या अधिकारावर प्रशासनाचे अतिक्रमण, सत्ता पक्षाचे दूर्लक्ष**

**महानगरपालिका अधिनियमाच्या कलमांची केली उघडउघड पायमल्ली**

**२४ जुलैची स्वच्छता निविदा तात्काळ रद्द करण्याची वादळी मागणी**




### नेमका घोटाळा / गैरप्रकार काय ?

१६ फेब्रुवारी २०२६ रोजी मनपा महासभेने ठराव क्र. ०४ मंजूर करून अकोला शहरातील ५१ भागांमध्ये कंत्राटी पद्धतीने स्वच्छता कामगार ( पडिक वार्ड) नियुक्त करण्यास मंजुरी दिली होती. या ठरावात शहराचे केवळ 'अ, ब, क व ड' या चार भागांमध्ये वर्गीकरण करून कंत्राटी / प्रशासकीय स्वरूप ठरवण्यात आले होते. महासभेने कोणत्याही भागाची भौगोलिक व्याप्ती, सीमा, रस्ते, प्रभागनिहाय विभागणी किंवा क्षेत्रफळ निश्चित केले नव्हते. असे असतानाही, आयुक्त व स्वच्छता विभाग प्रशासनाने २४ जुलै २०२६ रोजी ई-निविदा क्र. ०३ प्रसिद्ध करताना स्वतःच्या मनाने प्रत्येक भागाचे भौगोलिक कार्यक्षेत्र ठरवून टाकले. महासभेच्या मान्यतेशिवाय प्रशासनाला कार्यक्षेत्र आणि सीमा निश्चित करण्याचा हा अधिकार कुणी दिला ? हा प्रशासकीय मनमानीचा प्रशासक राज कायम असल्याचे आणि बेकायदेशीरपणाचा कळस मानला जात आहे.

### कायद्याची पायमल्ली: महापालिकेचे कलम काय सांगते ?

लोकप्रतिनिधींनी सभागृहात घेतलेल्या निर्णयांना कचऱ्याची टोपली दाखवणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या अंतर्गत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. आयुक्त हे मनपाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. त्यांचे एकमेव कर्तव्य महासभेने मंजूर केलेल्या ठरावांची अंमलबजावणी करणे हे आहे. महासभेच्या मंजुरीशिवाय स्वतःहून कोणताही धोरणात्मक निर्णय घेण्याचा किंवा नवीन अटी जोडण्याचा अधिकार आयुक्तांना अजिबात नाही. महापालिकेच्या सर्व धोरणात्मक व आर्थिक बाबींवर अंतिम नियंत्रण हे लोकप्रतिनिधींच्या महासभेचेच असते. त्यामुळे प्रभागांचे पुनर्गठन किंवा कार्यक्षेत्र ठरवणे हा संपूर्णतः महासभेचाच अधिकार आहे. कोणत्याही निविदेचा पाया हा सक्षम प्राधिकरणाने (महासभेने) ठरवलेल्या अटींनुसारच असावा लागतो. मंजूर ठरावात नसलेले नवीन क्षेत्र प्रशासनाने स्वतः ठरवणे म्हणजे कायद्याच्या मूळ हेतूलाच हरताळ फासणे आहे.

# देहभाव हरपला, तुज पाहता विठ्ठला..!

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सपत्नीक महापूजा

प्रतिनिधी २५ जुलै

पंढरपूर : आषाढी एकादशीनिमित्त राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज (२५ जुलै रोजी) पंढरपुरातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात पांडुरंगाची सपत्नीक शासकीय महापूजा केली. आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या शासकीय महापूजेसाठी यंदा धाराशिव जिल्ह्याला मानाचा बहुमान मिळाला आहे. धाराशिवच्या कळंब तालुक्यातील गौरगावचे रहिवासी असणारे माने दाम्पत्य यंदाचे मानाचे वारकरी ठरले आहे.

पहाटेपासूनच पंढरपुरात वारकऱ्यांच्या भक्तीचा अलोट महासागर सध्या अनुभवायला मिळाला आहे. तर भक्तांची २०-२५ किलोमीटरपर्यंत रांगा लागल्याचे चित्र आहे. एकूणच चंद्रभागेच्या तिरावर भक्तांचा महापूर देखील विठ्ठलनगरीत अनुभवायला मिळतो आहे. दरम्यान, विठ्ठलाची महापूजा संपन्न झाल्यानंतर मुख्यमंत्री आणि धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील गौरगाव येथील रहिवासी असणारे आणि यंदाचे मानाचे वारकरी असलेले माने दाम्पत्यासह रुक्मिणी मातेच्या दर्शनाला गेले.



इथं रुक्मिणी मातेला दुग्धाभिषेक घालून मुख्यमंत्री फडणवीस आणि माने दाम्पत्यांनी पूजा केली. त्यानंतर विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मुख्यमंत्री फडणवीस यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

### पंढरपुरात नवीन भक्तनिवास लवकरच!

पंढरपुरातील संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान पादुका मंदिराच्या नव्या भक्त निवासाचे भूमिपूजन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज संपन्न झाले. यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे उपस्थित होते. विठ्ठलाची शासकीय पूजा झाल्यानंतर आळंदी देवस्थानच्या वतीने पंढरपुरात नवीन भक्तनिवास उभं केले जात आहे. याचच भूमिपूजन सोहळा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते संपन्न झाला. त्यामुळे आता पंढरपुरात संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका मंदिरासोबतच नवे भक्तनिवास लवकरच उभारले जाणार आहे.

### तरुणाईला दिशा देण्यासाठी पंतप्रधान मोदींना आशीर्वाद द्यावा : मुख्यमंत्री

विठ्ठल मंदिरात आलं की उर्जा मिळते. राज्यात सर्वत्र चांगला पाऊस पडु दे, हेच विठुरायाकंडे साकडे घातले. तरुणाईला दिशा देण्यासाठी पंतप्रधान मोदींना आशीर्वाद द्यावा, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# अखेर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा

प्रतिनिधी २५ जुलै

**दिल्ली** : शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. नीट पेपरफुटीसाठी त्यांना जबाबदार धरत जंतर मंतर येथे ३६ दिवसांपासून आंदोलन सुरू होते. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याशिवाय दुसरे काहीही आम्ही स्वीकारणार नाही, असे आंदोलकांनी म्हटले होते. दरम्यान, या राजीनाम्याने तरुणांचा मोठा विजय मानला जात आहे. इतकेच नाही तर विरोधकांनी देखील हे प्रकरण चांगलेच तापविले होते. देशभरात या विरोधात आंदोलन झाले. आज अखेर धमेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. भविष्यात कुठल्याही स्पर्धा परीक्षांचे पेपर फुटणार नाही याची ग्वाही घेतली जात आहे. गेल्या 35 दिवसांपासून दिल्लीतील जंतर मंतर येथे सुरु असलेल्या कॉकरोच जनता पार्टी आणि विद्यार्थ्यांकडून सुरु असलेल्या आंदोलनाला अखेर यश आले आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शनिवारी दुपारी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळात एखाद्या आंदोलनानंतर किंवा आरोपांनंतर केंद्रीय मंत्र्याला राजीनामा द्यावा लागण्याची ही पहिलीच वेळ आहे. कॉकरोच जनता पार्टी आणि जंतर मंतरवरील विद्यार्थ्यांनी धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्याच्या मागणीबाबत कोणतीही तडजोड करणार नाही, असा इशारा देत आंदोलन आणखी तीव्र करण्याची इशारा दिला होता. दिल्लीतील या आंदोलनाचे लोण मुंबई, राजस्थान, बिहार, गुवाहाटी अशा सर्वच राज्यांमध्ये पसरले होते.

### वस्तापूर शिवारात शेतमजुरावर रानडुकरांचा हल्ला

अकोट : तालुक्यातील सातपुडा परिसरातील वस्तापूर शेतशिवारात शेतात फवारणीचे काम सुरू असताना एका शेतमजुरावर रानडुकरांच्या कळपाने हल्ला केल्याची घटना शनिवारी घडली. या हल्ल्यात शेतमजूर गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर अकोट ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी अकोला येथील शासकीय रुग्णालयात रेफर करण्यात आल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रमेश श्रीराम कासदे हे शेतात पिकांवर फवारणी करीत असताना अचानक रानडुकरांच्या कळपाने त्यांच्यावर हल्ला चढविला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले.

# 'दिल्लू' समोर 'बिल्ली' झाला विभाग !

## पातूरच्या बनावट दारू कारखान्यावर धाड केव्हा ?

प्रतिनिधी २५ जुलै

**अकोला** : बाळापूर च्या सातरगाव येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने टाकलेल्या धाडीत खळबळजनक माहिती सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती लागली आहे. त्याचा खुलासा पुढील काही दिवसात सिटी न्यूज करणार असून या प्रकरणात दिल्लू च्या नावाच्या दारु उत्पादकावर कारवाई करण्यात आल्याची धक्कादायक माहिती असून तो एका बड्या राजकीय नेत्याचा पंटर असल्याची माहिती मिळाली आहे. या बनावट दारू कारखान्यात या बड्या राजकीय नेत्याची गुंतवणूक तर नाही ना अशी विचारणा आता होत



आहे. या सर्व प्रकरणात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाची कसुन चौकशी मुख्यमंत्र्यांनी करावी अशी मागणी समोर येत आहे. इतकेच नाही तर पातूर येथे असलेल्या बनावट दारूच्या दूसऱ्या कारखान्यावर भरारी पथक कारवाई करेल काय अशी चर्चा सुरु झाली आहे.

### बनावट दारूचा कोणताही ब्रँड

पातूर, बाळापूर येथे बनावट दारूचा कोणताही ब्रँड उत्पादीत होत असल्याची धक्कादायक माहिती आहे. यातून पुण्यासारखे एखादे प्रकरण अकोल्यात झाल्यास नवल वाटू नये. अशी काय ती परिस्थिती आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे या सर्व गोष्टींकडे दूर्लक्ष आहे की हफ्तेखोरी याची चौकशी होण्याची गरज आता व्यक्त केली जात आहे. कोणत्या ही दारूचा ब्रँड या बनावट कंपन्या तयार करण्यात यशस्वी होत असल्याची माहिती असून बिल्लू हा कोणाचा पाठिराखा, राजकीय कार्यकर्ता आहे याचा ही शोध घेण्याची गरज आता व्यक्त केली जात आहे.

### पंढरपूरात गर्दीचा उच्चांक!

**पंढरपूर** : विठू माझा लेकुरवाळा संगे भक्तांचा मेळा या अभंगाची प्रचिती आजच्या एकादशीच्या सोहळ्यात उपस्थित भाविकांच्या संख्येवरून जाणवत आहे. गेल्या दहा वर्षात पायी चालत आणि आषाढी,कार्तिकी,माघी,चैत्री या प्रमुख यात्रेसह सुट्टीचे दिवस, सण.उत्सव अशा कालावधीत पंढरीकडे येणाऱ्या भाविकांचा ओढा वाढला आहे. यंदा भाविकांच्या संख्येने नवा उच्चांक गाठला आहे. एकादशीच्या दिवशी १५ ते १७ लाख भाविक असतील असा अंदाज आहे. तर प्रशासन आणि खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २५ ते ३० लाख भाविक असल्याचे सांगितले. यामुळे पंढरी नुसती गजबजली नाही तर भक्तांचा अलोट सागर पहावयास मिळाला.

# पोलीस पाटील व्यवस्थेच्या कामकाजावर गंभीर प्रश्न

## गोपनीय अहवाल, नूतनीकरण आणि पर्यवेक्षणाची चौकशी होणार

प्रवीण वानखडे २५ जुलै

**अकोला** : गावपातळीवरील कायदा व सुव्यवस्था राखण्याची महत्त्वाची जबाबदारी ज्यांच्या खांद्यावर आहे, त्या पोलीस पाटील व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर अकोला जिल्ह्यात सध्या गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. गावातील अवैध धंदे, सामाजिक तणाव, गुन्हेगारी हालचाली आणि संशयास्पद व्यक्तींची माहिती प्रशासनाला वेळेवर देणे हे पोलीस पाटलांचे प्राथमिक कर्तव्य आहे. मात्र, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी ही व्यवस्था अपेक्षित परिणाम देत नसल्याची तीव्र चर्चा नागरिकांमध्ये सुरु आहे. त्यामुळे प्रशासनाने या व्यवस्थेचे स्वतंत्र ऑडिट करून प्रत्यक्ष कामकाजाची तपासणी करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.



### आढाव्याचे आव्हान

अकोला जिल्ह्याचे प्रमुख प्रशासकीय अधिकारी म्हणून जिल्हाधिकाऱ्यांसमोर या संपूर्ण व्यवस्थेचा सखोल आढावा घेण्याचे मोठे आव्हान आहे. जिल्ह्यातील सर्व पोलीस पाटलांच्या कामकाजाचे स्वतंत्र परीक्षण, गोपनीय अहवालांचे पुनर्मूल्यांकन आणि नियमांचे काटेकोर पालन तपासणे गरजेचे बनले आहे.

### गोपनीय अहवाल की केवळ औपचारिकता ?

ग्रामीण भागातील अनेक नागरिकांमध्ये आजही पोलीस पाटील हे वयाच्या ६० वर्षांपर्यंत कायमस्वरूपी पदावर राहतात, असा गैरसमज आहे. परंतु कायदेशीर तरतुदीनुसार त्यांच्या कामाचे नियमित मूल्यमापन होणे अपेक्षित असते. दरवर्षी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून त्यांच्या कार्याचा गोपनीय अहवाल तयार केला जातो. मात्र, हा अहवाल वस्तुनिष्ठ निकषांवर आधारित असतो की केवळ औपचारिकता म्हणून कागदोपत्री पूर्ण केला जातो, याची सखोल पडताळणी करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

### अवैध धंद्यांवर माहितीचा अभाव ?

अनेक गावांमध्ये अवैध दारू विक्री, जुगार, मटका आणि स्थानिक वाद यांसारखे बेकायदेशीर प्रकार उघडपणे सुरू असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येतात. अशा परिस्थितीत गावच्या पोलीस पाटलाकडून ही माहिती पोलीस प्रशासनापर्यंत वेळेवर पोहोचते का, असा सवाल उपस्थित होत आहे. नियमांनुसार गावाबाहेर जाताना सक्षम अधिकाऱ्यांची परवानगी घेणे आणि दुसऱ्या पोलीस पाटलाकडे पदभार सोपवणे बंधनकारक आहे. हजेरीपत्रके, रजा नोंदवही आणि प्रत्यक्ष उपस्थितीचे स्वतंत्र ऑडिट झाल्यासच यातील सत्यता समोर येऊ शकते.



## निसर्गाची किमया

निसर्गाची किमया म्हणजे या पृथ्वीवरील अद्भूत आणि सुंदर चमत्कार. यात उंच पर्वत, खळाळत्या नद्या, हिरवी वने, आणि विविध जीव-जंतूंचा समावेश होतो. निसर्गाचे रूप आणि घटकपावसाची जादू: काळे ढग आणि सूर्यप्रकाश एकत्र आले की सुंदर



इंद्रधनुष्य तयार होते.प्राणी आणि पक्षी: मोराचे रंग, पानासारखे दिसणारे कीटक, आणि निसर्गातील नवनवीन चमत्कार आपल्याला थक्क करतात.जीवन चक्र: छोट्या बीजापासून भलेमोठे झाड तयार होणे आणि ऋतूंचे बदलणे हा एक मोठा चमत्कार आहे.निसर्गाचे महत्त्वशांतता: निसर्गामुळे मनाला आणि शरीराला आराम मिळतो.सजीव सृष्टी: हवा, पाणी आणि अन्न मिळवून निसर्ग सर्व जीवांचे संगोपन करतो.

# आषाढी एकादशी – इतिहास, महत्त्व आणि पंढरपूरची वारी

"बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल ।
करावा विठ्ठल जीवभाव ॥"

या अभंगातील प्रत्येक शब्द आषाढी एकादशीचे सार सांगतो. आषाढी एकादशी म्हटले की, डोळ्यांसमोर उभी राहते ती लाखो वारकऱ्यांची पंढरपूरची वारी, मुखी अखंड विठ्ठलनाम आणि हृदयात भक्तिभाव ! जसे लहान मूल आईकडे धावत जाते, तशीच ओढ वारकऱ्यांना विठ्ठलाच्या भेटीची असते. तसेच जसे चातक पक्षी पावसाच्या एका थेंबाची आतुरतेने वाट पाहतो, तशीच भक्तांची तळमळ विठ्ठलदर्शनासाठी असते. वर्षभरातील २४ एकादशांमध्ये आषाढी एकादशीला विशेष महत्त्व आहे. या दिवशीच्या व्रतात सर्व देवतांचे तेज एकवटलेले असते. या व्रतामागील इतिहास, तिचे महत्त्व आणि पंढरपूरच्या वारीविषयीची माहिती जाणून घेऊया.

आषाढ मासाच्या शुक्ल पक्षातील एकादशीला 'देवशयनी (देवांच्या निद्रेची) एकादशी' आणि वद्य पक्षातील एकादशीला 'कामिका एकादशी', असे म्हणतात.

पूर्वी देव आणि दानव यांच्यात युद्ध पेटले. कुंभ दैत्याचा पुत्र मृदुमान्य याने तप करून शंकराकडून अमरपद मिळवले. त्यामुळे तो ब्रह्मदेव, विष्णु, शिव अशा सर्व देवांना अजिंक्य झाला. त्याच्या भयाने देव त्रिकुट पर्वतावर धात्री (आवळी) वृक्षातळी एका गुहेत दडून बसले. त्यांना त्या आषाढी एकादशीला उपवास करावा लागला. पर्जन्याच्या धारेत स्नान घडले. अकस्मात त्यांच्या सर्वांच्या श्वासापासून एक शक्ती उत्पन्न झाली. त्या शक्तीने गुहेच्या दाराशी टपून बसलेल्या मृदुमान्य दैत्याला ठार मारले. ही जी शक्तीदेवी, तीच एकादशी देवता आहे.

आषाढी एकादशीच्या व्रतात सर्व देवतांचे तेज एकवटलेले असते. कामिका एकादशी ही मनोकामना पूर्ण करणारी आणि पुत्रदायी एकादशी आहे. या दिवशी श्रद्धेने केलेले व्रत, नामस्मरण आणि उपासना यांमुळे आध्यात्मिक उन्नतीस पोषक वातावरण निर्माण होते.

आदल्या दिवशी दशमीला एकभुक्त रहायचे. एकादशीला प्रातःस्नान करून तुळसी वाहून विष्णुपूजन करायचे. संपूर्ण दिवस उपवास करायचा आणि रात्री हरिभजन करत जागरण करायचे. आषाढ शुद्ध द्वादशीला वामनाची पूजा करून पारणे सोडायचे. या दोन्ही दिवशी 'श्रीधर' या नावाने श्रीविष्णूची पूजा करून अहोरात्र




तुपाचा दिवा लावण्याचा विधी करतात.

'एकावर एक ११ म्हणजे एकादशी. याचा अर्थ एकत्व सोडू नये. या दिवशी लंघन करणे, उपवास करणे, याचा उद्देश आहे, लक्ष तिकडे न जाता भगवंताकडे रहावे. मात्र आता हा अर्थ गौण झाला आहे आणि उपवास प्रधान झाला आहे ! या दिवशीचे तत्त्व साधना करण्याला अनुकूल असते. एकादशी प्रतिदिनच केली पाहिजे; मात्र एक दिवस योग्य तऱ्हेने केल्यास त्याचा प्रभाव १५ दिवस टिकतो; म्हणून एका मासात २ एकादशी असतात.' – परात्पर गुरु परशराम पांडे महाराज अदृश्य भगवंताच्या अस्तित्वाचा एक भक्कम पुरावा म्हणजे पंढरपूर ! वैकुंठभुवनाच्या आधीपासून पंढरपूर अस्तित्वात आले. त्यामुळे पृथ्वीवरील सर्वांत पुरातन तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपूरचा उल्लेख केला जातो. त्यासंदर्भात एक ओवी आहे –

"आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी."

संत नामदेव महाराजही आपल्या अभंगात सांगतात –

"जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर !"

पृथ्वीवरील केवळ दोनच तीर्थक्षेत्रे नाश न पावणारी आहेत. एक म्हणजे काशी आणि दुसरे म्हणजे पंढरपूर; कारण या क्षेत्रांचा अविनाशी तत्त्व असा महिमा भगवान शंकर आणि विष्णु यांनी आपल्या अखंड वास्तव्याने कथन केला आहे. काशीमध्ये शंकराचे आणि पंढरपूरमध्ये विष्णूचे स्थूल रूपात अस्तित्व आहे. म्हणूनच प्रत्येक हिंदू इहलोकाची यात्रा संपवण्यापूर्वी एकदा तरी काशीस अथवा पंढरपूरला जावे, अशी इच्छा बाळगून असतो. सप्तपुऱ्यांपेक्षाही थोरवी प्राप्त झालेले हे पंढरपूर आहे.

"बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल ।
करावा विठ्ठल जीवभाव ॥"

या अभंगाची प्रचीती प्रत्येक वारकरी आणि विठ्ठलभक्त नित्यनेमाने घेत असतो. नव्हे, तर पंढरीचा विठ्ठल हा वारकऱ्यांचा श्वासच आहे. त्याच्या नामाविना त्यांचे कोणतेच कर्म होत नाही. अशा भगवद्भक्त वारकऱ्यांचा महासंगम पंढरपूर यात्रेच्या, म्हणजेच वारीच्या निमित्ताने होत असतो.

प्रत्येकाचे कल्याण चिंतणे, कार्यात भगवंताला पहाणे, धर्मपूर्वक गृहस्थाश्रमाचे पालन करणे आणि भागवतधर्माचा मार्ग सुकर करणे, हेच वारकऱ्यांचे भक्तीमय जीवन आहे.

आषाढी एकादशी ही केवळ उपवासाची तिथी नसून आत्मशुद्धी, नामस्मरण आणि भगवंताशी एकरूप होण्याची सुवर्णसंधी आहे. या पवित्र दिवशी विठ्ठलाचा नामजप, उपासना आणि एकादशी व्रत यांद्वारे आध्यात्मिक लाभ घेऊया. विठ्ठलाच्या चरणी भक्तिभावाने नतमस्तक होऊन, अखंड नामगजराने स्वतःचे आणि समष्टीचे कल्याण होण्यासाठी प्रार्थना करूया.

**संकलन : श्रीमती प्रतिभा जडी**
८३२९३०८५१७

# वृक्ष संवर्धनाचे महत्त्व व आपली जबाबदारी



निसर्गाचा मूळ आधार आहे. नवीन झाडांची लागवड झाडे ही पृथ्वीवरील जीवसष्टीचा खरा पाठीराखा आहेत. ती आपल्याला जगण्यासाठी आवश्यक असणारा ऑक्सिजन देतात आणि हवेतील हानिकारक कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात. झाडांमुळे हवामान संतुलित राहते. फक्त झाडे लावणे पुरेसे नाही, तर ती जगवणे जास्त महत्त्वाचे आहे. दरवर्षी पावसाळ्यात स्थानिक प्रजातींची (उदा. कडुनिंब, वड, पिंपळ, आवळा) जास्तीत जास्त झाडे लावली पाहिजेत.

हवामान बदल व प्रदूषण, पाण्याची व संरक्षणाची काळजी महत्त्वाची आहे. आज जगभरात ग्लोबल वॉर्मिंग (जागतिक तापमानवाढ) आणि अवेळी पाऊस यांसारख्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. बेसुमार वृक्षतोडीमुळे जमिनीची धूप होत आहे आणि भूगर्भातील पाण्याची पातळी खालावत चालली आहे. लावलेल्या रोपट्यांना नियमित पाणी देणे, त्यांच्याभोवती ट्री-गार्ड (संरक्षक जाळी) लावणे आणि गुरांपासून त्यांचे रक्षण करणे ही काळाची गरज आहे. सेंद्रिय खतांचा वापर करून झाडांचे पोषण करावे.

जैवविविधता धोक्यात. सामाजिक सहभाग व जनजागृती देखील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे.

जंगले आणि झाडे नष्ट झाल्यामुळे अनेक पक्षी व प्राण्यांचे अधिवास (घरे) नष्ट होत आहेत. यामुळे अनेक दुर्मिळ प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. निसर्गाचे चक्र टिकवून ठेवण्यासाठी वृक्ष संवर्धन अत्यंत गरजेचे आहे.वृक्ष संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. वाढदिवस, सण किंवा विशेष प्रसंगी "एक झाड भेट" देण्याची सवय लावली पाहिजे. शाळा आणि महाविद्यालयांतून वृक्षदिंडी व मोहिमा राबवाव्यात.

# आमच्या आहारातच आहे उत्तर; विज्ञानही आता तेच सांगतंय!

आपल्या घरात रोज काय बनतं? भाजी, डाळ, भात, चपाती किंवा भाकरी, कोशिंबीर, ताक. पण अनेकदा आपणच म्हणतो, 'हे तर साधं जेवण आहे, यात विशेष काय पोषण असणार?'खरं तर, जगातील दोन मोठ्या संशोधनांनी दाखवून दिलं आहे की हेच साधं, घरचं जेवण दीर्घकाळ निरोगी आयुष्य जगण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावू शकतं.

............

### पहिला अभ्यास - मार्च २०२५

सुमारे १,०५,००० लोकांवर तब्बल ३० वर्षे केलेल्या या अभ्यासात संशोधकांनी एक महत्त्वाचा प्रश्न विचारला.

वयाच्या ७० व्या वर्षी खऱ्या अर्थाने निरोगी कोण असतं? म्हणजे फक्त जिवंत असणं नव्हे, तर.. शरीर सक्षम असणं, मेंदू चांगलं कार्य करणं, मानसिक आरोग्य चांगलं असणं आणि मोठे दीर्घकालीन आजार नसणं.

या अभ्यासात असं आढळलं की, ४० ते ६० वयोगटात ज्या लोकांनी भाज्या, फळं, कडधान्यं, संपूर्ण धान्यं आणि नट्स यांचा अधिक समावेश असलेला आहार घेतला, त्यांच्यात पुढील आयुष्यात निरोगी वृद्धत्वाची शक्यता लक्षणीयरीत्या जास्त होती. हा फायदा फक्त एका आजारापुरता मर्यादित नव्हता, तर शरीर, मेंदू आणि मानसिक आरोग्य या तिन्ही बाबींमध्ये दिसून आला.

### दुसरा अभ्यास - जून २०२६

या अभ्यासात ३,०४२ निरोगी प्रौढांचा २० वर्षे पाठपुरावा करण्यात आला. संशोधकांनी तीन प्रकारच्या आहारपद्धतींची तुलना केली



१) भाज्या, कडधान्यं, फळं आणि संपूर्ण धान्यांनी समृद्ध आहार

२) प्रोसेसड फूड, रेडी मीट आणि फास्ट फूड जास्त असलेला वेस्टर्न पॅटर्न

३) जास्त कॅलरीज पण कमी पोषणमूल्य असलेला आहार

२० वर्षांनंतर असं दिसून आलं की वनस्पतीजन्य अन्नाचा जास्त समावेश असलेल्या आहारामुळे हृदयविकाराचा धोका कमी असल्याचं आढळलं.

### प्लांट बसेड म्हणजे नेमकं काय?

याचा अर्थ पूर्णपणे शाकाहारी होणं किंवा मासे-मटण कायमचं बंद करणं असा नाही. याचा अर्थ इतकाच की, ताटात भाज्या जास्त असाव्यात. रोज डाळ किंवा कडधान्य असावं. ज्वारी, बाजरी, नाचणी, ओट्स, तांदूळ यांसारख्या संपूर्ण धान्यांचा समावेश असावा. नट्स आणि बिया योग्य प्रमाणात असाव्यात. आणि बिस्किटं, चिप्स, मैद्याचे पदार्थ, साखरयुक्त पेयं आणि जास्त प्रक्रिया केलेले पदार्थ शक्य तितके कमी असावेत. तुम्ही मासे किंवा मांस खात असाल तरी हरकत नाही.

पण ताटात सर्वात जास्त जागा भाज्या आणि कडधान्यांनी व्यापलेली असणं अधिक फायदेशीर ठरू शकतं.

### महाराष्ट्रीयन पारंपरिक जेवणाची खासियत

आपलं पारंपरिक जेवण तर आधीपासूनच अनेक बाबतीत प्लांट बसेड आहे. ज्वारी-बाजरीची भाकरी, मूगडाळ खिचडी, मेथी, पालक, शेवगा, कारलं यांसारख्या भाज्या, मोड आलेली कडधान्यं, कोशिंबीर, ताक, लिंबू. हे पदार्थ केवळ पोट भरण्यासाठी नाहीत; ते शरीराला आवश्यक पोषकतत्त्वं, फायबर आणि विविध जैवसक्रिय घटक देतात. म्हणूनच आपल्या पूर्वजांच्या ताटात विज्ञानाने आज मान्य केलेले अनेक आरोग्यदायी घटक आधीपासून होते.

### मग आपण कुठे चुकतो?

हळूहळू घरच्या ताज्या जेवणाची जागा प्रक्रिया केलेल्या पदार्थांनी घेतली आहे. भाजी कमी, पोळी जास्त. डाळ कमी. फळं टाळून पॅकेटमधले स्नॅक्स जास्त. घरच्या खाण्यापेक्षा बाहेरचं प्रक्रिया केलेले पदार्थ अधिक. हे बदल एका दिवसात करायचे नाहीत. पण छोट्या सवयी नक्की बदलता येतात.

### आजपासून एवढीच सुरुवात करा

रोज एक वाटी डाळ किंवा कडधान्य खा. दिवसातून एक फळ खा. जेवणात एक पालेभाजी ठेवा. दिवसातील एक प्रक्रिया केलेला पदार्थ कमी करा. लहान वाटणारे हे बदल दीर्घकाळात मोठा फरक घडवू शकतात.

आजार झाल्यावर उपचार करणं महत्त्वाचं आहेच पण आजार होण्याआधीच तो टाळणं अधिक महत्त्वाचं. आणि त्याची सुरुवात आपल्या स्वयंपाकघरातून होऊ शकते.

# जगातील पहिल्या टेस्ट ट्यूब बेबीचा जन्म!



लुईस जॉय ब्राउन (जन्म २५ जुलै १९७८) ही एक इंग्लिश महिला असून , इन विट्रो फर्टिलायझेशन (आयव्हीएफ) द्वारे गर्भधारणा होऊन जन्मलेली पहिली मानव म्हणून ओळखली जाते. ब्रिटनमध्ये प्रथमच वापरल्या गेलेल्या या प्रक्रियेनंतर झालेल्या तिच्या जन्माचे, '२० व्या शतकातील सर्वात उल्लेखनीय वैद्यकीय शोधांपैकी' एक म्हणून कौतुक केले गेले आहे.

## लईस जॉन ब्राउनच्या जन्माची गोष्ट

इंग्लंडच्या मँचेस्टरमध्ये ओल्डहॅम या गावात लेस्ली आणि जॉन ब्राऊन या दाम्पत्याचा संसार सुरू होता. पण, दाम्पत्याची एक खंत होती. त्यांना ९ वर्षं मुलबाळ नव्हते. बरेच प्रयत्न केले. पण, त्यांना मुलबाळ झाले नाही. शेवटी दोघांनी डॉक्टरांचा सल्ला घायचं ठरवलं. १९७७ मध्ये दोघांनी ओल्डहम जनरल हॉस्पिटलच्या पॅट्रिक स्टेप्टो आणि रॉबर्ट एडवर्ड या दोन डॉक्टरांनी त्यांनी भेट घेतली. या दोन डॉक्टरांनी 'मानवी गर्भाशिवाय वाढणारे गर्भ' याचे तंत्र शोधून काढले होते. पण, या तंत्राचा वापर करण्याची संधी त्यांना मिळाली नव्हती. लेस्ली आणि ब्राऊन यांच्या रुपाने त्यांनी त्याचा प्रयोग करण्याची नामी संधी मिळाली. दोन्ही डॉक्टरांनी या तंत्रज्ञानाबद्दल आणि प्रक्रियेबद्दल लेस्ली आणि ब्राऊन यांनी समजावून सांगितले. दोघांनी हा प्रयोग करण्याचा निर्णय घेतला. मानवाच्या नैसर्गिक प्रजनन प्रक्रियेच्या इतिहासात फार मोठा बदल होता. आयव्हीएफ तंत्रामधून टेस्ट ट्यूब बेबी प्रयोग सुरू झाला. प्रयोगशाळेत हळुहळू तो गर्भ वाढू लागला. अखेर जुलै महिना उजाडला. हॉस्पिटलच्या बाहेर पत्रकारांची आणि इतर नागरिकांची गर्दी झाली होती. गर्दी इतकी होती की, हॉस्पिटलच्या बाहेर पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला. गर्भानं पूर्णत्व प्राप्त केलं होतं. २५ जुलै १९७८ रात्री ११ वाजून ४७ मिनिटांनी सुंदर आणि गोंडस मुलीचा जन्म झाला. तिचं वजन होतं २ किलो ६०८ ग्रॅम आणि तीचं नाव होतं लुईस. आरोग्य क्षेत्रात डॉ.पेट्रिक स्टेप्टो आणि रॉबर्ट एडवर्ड यांनी क्रांतीच केली होती. या यशस्वी प्रयोगाबद्दल डॉ. पेट्रोक स्टेप्टो यांना इंग्लंडमधील सर्वोच समजला जाणारा 'फेलो ऑफ द रॉयल सोसायटी' पुरस्काराने सन्मानित केले. डॉ. रॉबर्ट एडवर्ड यांना २०१० मध्ये 'नोबेल' पुरस्कारने गौरविण्यात आले.

ब्राऊनचे पालक, लेस्ली आणि जॉन ब्राऊन, नऊ वर्षांपासून नैसर्गिकरित्या गर्भधारणेचा प्रयत्न करत होते, परंतु लेस्लीला फॅलोपियन ट्यूब्स बंद झाल्यामुळे गुंतागुंत निर्माण झाली होती. १० नोव्हेंबर १९७७ रोजी, लेस्लीने ती प्रक्रिया करून घेतली जी नंतर पॅट्रिक स्टेपटो, रॉबर्ट एडवर्ड्स आणि जीन पर्डी यांनी विकसित केलेली इन विट्रो फर्टिलायझेशन म्हणून ओळखली जाऊ लागली. जरी माध्यमांनी ब्राऊनला 'टेस्ट ट्यूब बेबी' म्हणून संबोधले असले तरी, तिची गर्भधारणा प्रत्यक्षात पेट्री डिशमध्ये झाली होती. ब्राऊनच्या भ्रूणीय पेशींचे विभाजन होताना पाहणारे पर्डी हे पहिले होते.

लुईस जॉय ब्राउन यांचा जन्म २५ जुलै १९७८ रोजी ओल्डहॅमच्या जनरल हॉस्पिटलमध्ये, जॉन वेबस्टर यांनी केलेल्या नियोजित सी-सेक्शनद्वारे झाला. जन्मावेळी त्यांचे वजन ५ पाउंड, १२ औंस (२.६०८ किलो) होते. १९८२ मध्ये, ब्राउन यांची बहीण नॅटली हिचा जन्म देखील आयव्हीएफद्वारे गर्भधारणा झाल्यानंतर झाला, आणि ती जगातील ४० वी अशी जिवंत जन्मलेली बाळ ठरली; मे १९९९ मध्ये, नॅटली ही आयव्हीएफद्वारे गर्भधारणा झालेली पहिली मानवी बाळ ठरली जिने स्वतः बाळाला जन्म दिला, जरी तिने हे आयव्हीएफशिवाय केले. २००४ मध्ये, ब्राउनने नाईटक्लबचा डोअरमन वेस्ली मुलिंडरशी लग्न केले; आयव्हीएफचे प्रणेते असलेल्या त्रिकुटातील एकमेव हयात सदस्य एडवर्ड्स त्यांच्या लग्नाला उपस्थित होते. त्यांचा पहिला मुलगा, जो नैसर्गिकरित्या गर्भधारणा झाला होता २० डिसेंबर २००६ रोजी जन्मला. त्यानंतर तिला आणखी एक मूल झाले आहे. ब्राउनच्या वडिलांचे २००६ मध्ये वयाच्या ६४ व्या वर्षी निधन झाले, तर तिच्या आईचे २०१२ मध्ये पित्ताशयाच्या संसर्गामुळे झालेल्या गुंतागुंतीमुळे वयाच्या ६४ व्या वर्षी निधन झाले.

लुईस एक प्रसिद्ध लेखिका आहे. तिने आपल्या जीवनावर 'माय लाईफ एज द वर्ल्ड्स फर्स्ट टेस्ट ट्यूब बेबी' नावाचं आत्मचरित्रदेखील लिहिलं आहे. लुईस एक शिपिंग ऑफिसमध्ये काम करते आहे. भलेही नैसर्गिकपणे लुईसचा जन्म झाला असेल, पण इतर कोणत्याही बाबतीत कमी नाहीये, हे तिनं सिद्ध केलेलं आहे.

**सध्या लुईस ब्राऊन काय करते?**

लुईसने ४ सप्टेंबर २००४ मध्ये वयाच्या २६ वर्षी वेल्सी मुलिंदरशी विवाह केला. लग्नानंतर २ वर्षांनी कॅमरॉन नावाचा मुलगा झाला. नंतर २०१३ मध्ये पुन्हा लुईस आणि मुलिंदर यांना दुसरा मुलगा झाला. ही दोन्ही मुलं नैसर्गिक पद्धतीने झाली आहेत. सध्या लुईस आपल्या कुटुंबासहीत इंग्लंडमधील ब्रिस्टॉल शहरात राहत आहे.

## लुईस ब्राऊनच्या जन्मावरून नवा वाद

आयव्हीएफच्या तंत्रातून लुईस ब्राऊन जन्म झाला खरा. पण, धर्माच्या कट्टरतावाद्यांनी वेगवेगळे तर्क लावले. इंग्लंडमधील धर्मगुरू पोप पॉल सहावे म्हणाले की, 'ज्या प्रमाणे कारखान्यात एखादी वस्तू तयार होते, त्याप्रमाणे बेबी फॅक्टरीमध्ये लुईस नावाचे उत्पादन तयार झाले आहे.' लुईस ब्राऊनचा धर्म कोणता, हा प्रश्न आजही अनुत्तरीतच आहे. लुईला तिच्या धर्माबद्दल विचारलं की ती म्हणते, 'मी कोणत्याच धर्माची नाही. पण, मला धर्म नाही हे एका अर्थाने बरेच झाले. कारण, मला हवं तेव्हा कुठल्याही धर्माचं आचरण करू शकते', तिचं हे वाक्य खऱ्या अर्थानं स्वातंत्र्याची परिभाषा अधोरेखित करतं.

लुईस आपल्या आंतमचरित्रात सांगते की, 'त्या काळात माझ्या आई-वडिलांना हजारो पत्रे लिहिली गेली. त्या पत्रांमध्ये माझ्या जन्माबद्दलचा तिरस्कारच जास्त होता. एकाने तर रक्ताने पत्र लिहिलं होतं. टेस्ट ट्यूब बेबी निसर्गाच्या विरुद्ध आहे, असं त्यात लिहिलं होतं' तिरस्कार करणारे संदेश येत असल्याने आई लेस्ली लुईसला घराबाहेर घेऊन जाण्यास घाबरत होती', असेही अनुभव लुईसने सांगितले आहेत.

# आज जागतिक वंध्यत्व जागरूकता दिन

"पालकत्वाचा प्रवास प्रत्येकासाठी सारखा नसतो; पण आशा, विज्ञान आणि योग्य उपचार यांच्या मदतीने अनेकांची स्वप्ने पूर्ण होऊ शकतात." दरवर्षी २५ जुलै रोजी जागतिक वंध्यत्व जागरूकता दिन साजरा केला जातो. १९७८ साली जगातील पहिले आयव्हीएफ बाळ जन्माला आले. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. आधुनिक वैद्यकीय विज्ञानामुळे लाखो निःसंतान जोडप्यांना पालकत्वाचा आनंद मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे.

**या दिवसाचा मुख्य उद्देश :** वंध्यत्वाबाबत समाजामध्ये योग्य जनजागृती निर्माण करणे. वंध्यत्वाशी संबंधित गैरसमज, अंधश्रद्धा आणि सामाजिक कलंक दूर करणे. वंध्यत्वाचा सामना करणाऱ्या व्यक्ती व जोडप्यांना मानसिक, सामाजिक आणि भावनिक आधार देणे. आयव्हीएफ, आययूआय यांसारख्या आधुनिक प्रजनन उपचारांबाबत विश्वासार्ह माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे. वेळेवर तपासणी आणि उपचारांचे महत्त्व अधोरेखित करणे.

**वंध्यत्व किती सामान्य आहे? :** जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार, जगभरातील प्रत्येक ६ पैकी १ व्यक्तीला आयुष्यात कधीतरी वंध्यत्वाचा अनुभव येतो. त्यामुळे ही समस्या दुर्मीळ नसून एक महत्त्वाची आरोग्यविषयक बाब आहे. योग्य निदान, योग्य उपचार आणि सकारात्मक दृष्टीकोन यांच्या मदतीने अनेक जोडपी पालकत्वाचे स्वप्न पूर्ण करू शकतात.

**वंध्यत्व म्हणजे काय? :** लग्नानंतर नियमित वैवाहिक सहजीवन असूनही ठराविक कालावधीनंतर गर्भधारणा न होणे किंवा गर्भ टिकून न राहणे, याला वैद्यकीय भाषेत वंध्यत्व म्हणतात.

महत्त्वाची बाब म्हणजे वंध्यत्व ही केवळ महिलांची समस्या नसून ती स्त्री किंवा पुरुष दोघांमध्येही असू शकते. अनेक वेळा दोघांमध्येही काही वैद्यकीय कारणे असू शकतात. त्यामुळे तपासणी आणि उपचार दोघांनीही एकत्रितपणे करणे आवश्यक आहे.

**महिलांमधील वंध्यत्वाची प्रमुख कारणे :**

**ओव्हुलेशन (अंडोत्सर्ग) विकार :** हार्मोन्सचे असंतुलन किंवा इतर कारणांमुळे नियमित अंडोत्सर्ग न होणे.

**फॅलोपियन ट्यूबमध्ये अडथळा:**

संसर्ग, क्षयरोग किंवा इतर कारणांमुळे गर्भनलिका बंद होणे.

### पुरुषांमधील वंध्यत्वाची प्रमुख कारणे

शुक्राणूंची संख्या कमी असणे, शुक्राणूंची हालचाल कमी असणे, शुक्राणूंची गुणवत्ता कमी असणे, धूम्रपान, मद्यपान, तंबाखू, अमली पदार्थ, लठ्ठपणा, ताणतणाव आणि असंतुलित जीवनशैली.

उपचार आणि उपायात संतुलित व सकस आहार नियमित व्यायाम व वजन नियंत्रण, धूम्रपान, मद्यपान व तंबाखूचे सेवन टाळणे, मानसिक ताण कमी ठेवणे, वेळेवर तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे, आवश्यकतेनुसार हार्मोनल उपचार, आधुनिक प्रजनन तंत्रज्ञान उपचारांचा लाभ घेणे. आज वैद्यकीय क्षेत्रातील प्रगत तंत्रज्ञानामुळे अनेक जोडपी यशस्वीपणे पालक बनत आहेत. त्यामुळे वंध्यत्व ही कायमची समस्या आहे, असा समज चुकीचा आहे.

### समाजासाठी महत्त्वाचा संदेश

आजही आपल्या समाजात मूल न झाल्यास अनेकदा महिलेलाच दोष दिला जातो. तिच्यावर मानसिक, सामाजिक आणि कौटुंबिक दबाव टाकला जातो. ही अत्यंत चुकीची आणि अन्यायकारक मानसिकता आहे.

**गर्भाशयातील समस्या :** फायब्रॉइड्स (गाठी), एंडोमेट्रिओसिस, गर्भाशयातील विकृती किंवा सूज.

**वाढते वय:** वयानुसार अंड्यांची संख्या व गुणवत्ता कमी होणे.

**लक्षात ठेवा –** वंध्यत्वाचे कारण स्त्रीमध्ये, पुरुषामध्ये किंवा दोघांमध्येही असू शकते. त्यामुळे कोणालाही दोष न देता दोघांनीही वैद्यकीय तपासणी करून योग्य उपचार घेणे आवश्यक आहे.

वंध्यत्व हा लाजेचा विषय नाही, तर उपचार करता येणारी वैद्यकीय समस्या आहे. अशा जोडप्यांना दोष देण्याऐवजी त्यांना समजून घेणे, आधार देणे आणि योग्य मार्गदर्शन करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

**जनजागृतीचा संदेश :** "वंध्यत्व लपवू नका... समजून घ्या, तपासणी करा, उपचार घ्या." "महिलेला दोष देऊ नका... कारण वंध्यत्वाची कारणे स्त्री आणि पुरुष दोघांमध्येही असू शकतात." "विज्ञान, योग्य उपचार आणि सकारात्मक दृष्टीकोन यांच्या मदतीने पालकत्वाचे स्वप्न नक्कीच साकार होऊ शकते."

**डॉ. विनोद करंजेकर**
जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी
जिल्हा परिषद, अकोला



## अवघे गर्जे पंढरपूर चालला नामाचा गजर

# विठ्ठल मंदिर परिसर भक्तिमय

प्रतिनिधी २५ जुलै

**अकोला :** अकोल्यातील राजराजेश्वर नगरी मध्ये आषाढी एकादशीच्या निमित्ताने सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील विविध मंदिरांमध्ये विठ्ठल नामाचा गजर सुरू असून, जुन्या शहरातील ३२२ वर्षे प्राचीन श्री विठ्ठल मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

२२ ते ३० जुलै दरम्यान मंदिरात अखंड हरिपाठ, विविध भजन मंडळांचे सादरीकरण तसेच कीर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले आहे. सन १९३३ पासून सुरू असलेल्या या परंपरेनुसार दररोज सकाळी ६ वाजल्यापासून विविध भजन मंडळे विठ्ठल चरणी सेवा अर्पण करत आहेत.

आज आषाढी एकादशीच्या दिवशी पहाटे विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीचा वेदमंत्रानी दूग्धाभिषेक व षोडस पूजन तसेच महाआरती सर्वसेवाधारी कृष्णा गोवर्धन शर्मा सौ. अर्चना कृष्णा शर्मा सहपत्नी हस्ते संपन्न झाली. यंदा ३५ हून अधिक भजन मंडळांनी सप्ताहात सहभाग नोंदविला असून, दररोज सायंकाळी कीर्तनाचे आयोजन करण्यात येत आहे. वीणेकरी आणि वारकरी दिवसरात्र हरिनामात तल्लीन असून, मंदिर परिसर अखंड विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून









गेला आहे. असी माहिती व्यवस्थापक रमेश अलकरीनी दिली. शहरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून नामस्मरण, भजन व कीर्तनाचा लाभ घेत आहेत. आषाढी एकादशीच्या निमित्ताने संपूर्ण परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघाला असून, "विठ्ठल... विठ्ठल..." च्या जयघोषाने वातावरण अधिकच मंगलमय झाले आहे. महापूजा वेळी प्रामुख्याने माजी नगर सेवक सतीश ढगे, संतोष अनासने,दीपक बजाज,नवीन गुप्ता, राधेश्याम शर्मा,किशोर मागटे पाटिल, प्रफुल्ल चंद्रानी श्याम घाटे, सचिन मुदिराज, आनंद उगले, महेश कडुस्कर बबलू ठाकुर नितिन खोत, यशोधन गोळबोळे आदि उपस्थित होते.

## स्कूल ऑफ स्कॉलर्स, पारस मध्ये आषाढी एकादशी उत्साहात साजरी!

प्रतिनिधी २५ जुलै



**बाळापूर :** दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी स्कूल ऑफ स्कॉलर्स, पारस येथे दिनांक २४/०७/२०२५, शुक्रवार रोजी आषाढी एकादशी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी शाळेतील मुला- मुलींनी वारकऱ्यांचे पोशाख परिधान केले होते. कोणी विठोबा, कोणी रुक्मिणी तर कोणी संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव तर कोणी वासुदेव बनले होते.

या प्रसंगी कार्यक्रमाला शेखर चोपडे व उपप्राचार्य गंगा कोळसकर यांची उपस्थिती होती. सकाळी शेखर चोपडे व गंगा कोळसकर यांनी विठ्ठल रखुमाई प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात केली.

शाळेतील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या संतांचे अभंग, भक्ती गीते याप्रसंगी सादर केली. त्यानंतर शाळेच्या विद्यार्थ्यांची दिंडी राम मंदिर येथे नेण्यात आली. त्यावेळी मुलांच्या हातात भगवे ध्वज तर मुलींच्या डोक्यावर तुळशी वृंदावन हे बघून हे जणू खरच पंढरपूरच्या वारीला निघाल्याचा भास होत होता. एरवी शाळेच्या गणवेशात असलेले लहान मुलं आज मात्र वारकऱ्यांप्रमाणे डोक्यावर टोपी, गळ्यात टाळ, कपाळी गंध, बाल वारकरी स्कूलमध्ये अवतरले होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रोहित जगताप, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी पुढाकार घेतला.

## हिवरखेड जिल्हा परिषद कन्या शाळेत चिमुकल्यांची दिंडी

प्रतिनिधी २५ जुलै



**हिवरखेड :** येथील जी, प, कन्या शाळेत चिमुकल्या विद्यार्थ्यांनि काढली आषाढी एकादशी निमित्ताने पांडुरंग संस्थान पर्यंत दिंडी तसेच चिमुकल्यांनी जय हरी विठ्ठल नामस्मरण करून धार्मिक संदेश दिला यावेळी शाळेचे मुख्याध्यापक खिरोडकार सर, खडसे सर, आमले मैडम, भोपळे मैडम, निखाडे मैडम, येऊल मैडम, उंबरकार मैडम, उपस्थित होत्या. यावेळी शाळा परिसरात जनु पंढरपुर अवतरल्याचा भास होत होता चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून पालकही हरखून गेले होते हे चिमुकले विठ्ठल रूखुमाई येणाऱ्या जाणाऱ्यांचे लक्ष वेधून घेत होते अशा उपकमामुळे विद्यार्थ्यांना आपल्या सांस्कृतीक वारशाची ओळख होत आहे

## 'जय श्री श्याम'च्या जयघोषाने दुमदुमली राजराजेश्वर नगरी!

### हातात निशाण घेऊन शेकडो भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग





प्रतिनिधी २५ जुलै

**अकोला :** देवशयनी तथा आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त श्री रामदेव बाबा व श्री श्याम बाबा मंदिर तसेच ओल्ड सिटी ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी खाटू नरेश श्री श्याम बाबांची भव्य निशाण व पालखी यात्रा भक्तिमय वातावरणात काढण्यात आली. संपूर्ण मार्गावर "जय श्री श्याम"च्या जयघोषाने राजराजेश्वर नगरी दुमदुमून गेली.

श्री रामदेव बाबा व श्री श्याम बाबा मंदिराच्या वतीने राणी सती धाम येथून निशाण यात्रा प्रारंभ झाली. ही यात्रा तहसील कार्यालय, गांधी चौक व सिटी कोतवाली मार्गे पुढे सरकली. तर ओल्ड सिटी ग्रुपच्या वतीने डाबकी रोड येथील श्री गजानन महाराज मंदिरातून निशाण व पालखी यात्रा निघाली. ही यात्रा जुना शहर, विठ्ठल मंदिर, काळा मारुती मंदिर, लोखंडी पूल मार्गे सिटी कोतवाली येथे पोहोचली.

सिटी कोतवाली येथे दोन्ही यात्रा एकत्र आल्यानंतर भव्य शोभायात्रेच्या स्वरूपात भाविकांनी खोलेश्वर मार्गे गीतानगर येथील श्री रामदेव बाबा व श्री श्याम बाबा मंदिर गाठले. मंदिरात सर्व भाविकांनी श्रद्धाभावाने बाबा श्याम यांच्या चरणी निशाण अर्पण करून सुख, समृद्धी व मनोकामना पूर्ण होण्यासाठी प्रार्थना केली.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने मंदिर परिसरात दिवसभर विविध धार्मिक विधी, भजन-कीर्तन, विशेष पूजा-अर्चा व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होती. बाबा श्याम यांच्या मनोहारी स्वरूपाचे दर्शन घेऊन भाविकांनी पुण्यलाभ घेतला.

## आषाढी एकादशीनिमित्त साडेतीनशे वर्षे जुन्या मंदिरात भाविकांची मोठी गर्दी



प्रतिनिधी २५ जुलै

**पातूर :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त पातूर येथील सुमारे साडेतीनशे वर्षे जुन्या पुरातन मंदिरात शनिवारी पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी भक्तिभावाने नामस्मरण करत मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. मंदिरात दिवसभर हरिनाम सप्ताह, भजन, कीर्तन आणि विठ्ठल नामाचा अखंड गजर सुरू होता. वारकरी संप्रदायातील भाविकांनी टाळ-मृदंगाच्या गजरात अभंग गात विठ्ठलाच्या चरणी भक्ती अर्पण केली. मंदिर समितीच्या वतीने आषाढी एकादशीचे औचित्य साधून भाविकांसाठी उसळीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

मंदिर परिसरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांची शिस्तबद्ध रांग लावण्यात आली होती. मंदिर समितीच्या पदाधिकाऱ्यांसह स्वयंसेवकांनी दर्शन व प्रसाद वितरणाची व्यवस्था सुरळीत पार पाडली.

## जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटमध्ये रंगला आषाढी एकादशीचा भक्तिमय सोहळा

प्रतिनिधी २५ जुलै



**आलेगाव :** जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट, आलेगाव येथे आषाढी एकादशी निमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले. शाळा परिसर विठ्ठल नामाच्या गजराने, टाळ-मृदंगाच्या निनादाने आणि वारकरी परंपरेच्या उत्साहाने दुमदुमून गेला.

कार्यक्रमाची सुरुवात पंढरपूरच्या विठुरायाच्या पालखीच्या आगमनाने झाली. विद्यार्थी वारकरी वेशभूषेत सहभागी झाले होते. पालखीचे पूजन शाळेचे अध्यक्ष अक्षय जैन व संचालिका सौ. समता जैन यांच्या हस्ते झाले.

वर्ग दुसरीची विद्यार्थिनी भूमी राजनकर हिने आपल्या मधुर गौळण गायनाने उपस्थितांची मने जिंकली. तसेच नर्सरीचा विद्यार्थी अनय महल्ले, वर्ग दुसरीतील शिवानी काळपांडे व खुशी धाईत यांनी सुमधुर अभंग सादर करून संपूर्ण वातावरण विठ्ठलमय केले. नर्सरी व एल.के.जी. यू. के. जी.च्या विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषेत सहभागी होत कार्यक्रमाची शोभा वाढविली. विशेष आकर्षण म्हणून कियांश खंडागळे आणि प्रियांश धनवे यांनी अनुक्रमे भगवान विठ्ठल भक्त संत तुकाराम महाराज यांच्या वेशभूषेत अप्रतिम सादरीकरण केले. याशिवाय योगीराज महल्ले, वेदांत बंड, स्पंदन अजगर, वासुदेव कृष्णा राऊत, अनुश्री चव्हाण आणि सार्थक मुळे यांनी विविध संत व वारकरी परंपरेशी संबंधित वेशभूषा साकारून उपस्थितांची वाहवा मिळविली.

शाळेचे मुख्याध्यापक महावीर जैन यांनी विद्यार्थ्यांसोबत पाऊलीमध्ये सहभागी होत वारकरी परंपरेचा आनंद घेतला व विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित केला. भजनी मंडळींमध्ये गंगाबाई कोरकने , कमलाबाई रणमळे, मंदाबाई काठोळे, गंगाबाई साखरे, विमल कंटाळे, शुभांगी कोरकने आणि लीलाताई खरप यांचा सहभाग होता. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक महावीर जैन यांच्या नेतृत्वाखाली परिवेक्षक चंदा मुर्तडकर, नीलकंठ पस्तापुरे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी योगदान दिले.

## न्यू तापडिया नगरात निघाली पालखी; विठ्ठल मंदिरात आषाढी एकादशी साजरी

प्रतिनिधी २५ जुलै

**अकोला.** न्यू तापडिया नगरात विठ्ठल मंदिरात आषाढी एकादशी निमित्त पूजा, आरती करण्यात आली. तसेच उसळीचे वाटप करण्यात आले. श्री गजानन महाराज मंदिर पासून गजानन महाराजांच्या मुखवट्यासह पालखी काढण्यात आली.

भजने म्हणत पालखी श्री



विठ्ठल मंदिरात पोहोचली. लहान मुलांनी विठ्ठल रुखमाईची वेशभूषा केली होती. अतिशय आल्हाददायक वातावरण या



ठिकाणी होते. विठ्ठल नामाचा तसेच गण गण गणात बोते असा गजर करण्यात आला. गजानन मालठणकर, प्रवीण भिवगडे, नगर सेवक प्रशांत जोशी, चोपडे यांच्यासह परिसरातील महिला, पुरुषांचा आयोजनात सहभाग होता.

## आषाढी एकादशीनिमित्त श्री समर्थ पब्लिक स्कूलमध्ये पारंपरिक पालखी सोहळा उत्साहात

प्रतिनिधी २५ जुलै

**अकोला :** आषाढी एकादशीनिमित्त श्री समर्थ पब्लिक स्कूलमध्ये पारंपरिक पालखी सोहळा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी साकारलेली पंढरपूर वारी, विठ्ठल-रुक्मिणीचे प्रतीकात्मक दर्शन तसेच रिंगणाचा देखावा उपस्थितांची मने जिंकणारा ठरला. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

यावेळी विद्यार्थ्यांनी पालखी सोहळा, रिंगण, भक्तिगीतांची





मैफल, पारंपरिक नृत्य तसेच फुगडीचे आकर्षक सादरीकरण करून वारकरी संस्कृतीचे दर्शन घडविले. या प्रसंगी बोलताना संस्थापक अध्यक्ष प्रा. नितीन बाठे यांनी, "अकोल्यासारख्या पवित्र भूमीत विद्यार्थ्यांना पंढरपूर वारीचा आध्यात्मिक अनुभव देणे ही आनंदाची आणि दुर्मिळ संधी आहे. अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, भक्तीभाव आणि आपल्या परंपरेबद्दल अभिमान निर्माण होतो," असे सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थापक संचालिका प्रा. जयश्री बाठे होत्या. यावेळी प्रा. राजेश बाठे, प्रा. किशोर कोरपे, मुख्याध्यापिका डॉ. उषालता वानखेडे, उपमुख्याध्यापिका प्रेमेंद्र पळसपगार यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री समर्थ पब्लिक स्कूलच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या भक्तिमय सोहळ्याचे पालक व उपस्थितांनीही कौतुक केले.

## आषाढी एकादशीला भक्ती भावाचे दर्शन

प्रतिनिधी २५ जुलै

**अकोला:**शहरातील विविध विठ्ठल मंदिरात आषाढी एकादशी निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सकाळ पासून विठ्ठल मंदिरात पूजा अर्चा करण्यात आली. भजनी दिंडी काढण्यात आली. जय हरी विठ्ठल असा गजर करण्यात आला. विठ्ठल भक्ती मध्ये भाविक तल्लीन झाले होते. उपवास असल्याने उसळ वाटप करण्यात आले. लहान मुलांना विठ्ठल रखुमाईची वेशभूषा करून छान सजवले होते. सर्वत्र मोठ्या संख्येत वारकरी मंडळी दिसून येत होती. अनेक मंदीरात आज मोठ्या भक्तीभावाने पूजन करण्यात आले.

## आषाढी एकादशीनिमित्त अकोला अर्बन बँकेत विठ्ठल महापूजन



प्रतिनिधी २५ जुलै

**अकोला :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोला यांच्या प्रशासकीय कार्यालयात भक्तिमय वातावरणात भगवान श्री विठ्ठलाचे महापूजन संपन्न झाले.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजन सोनटक्के यांच्या हस्ते विधिवत महापूजन करण्यात आले. यावेळी बँकेचे माजी अध्यक्ष रामेश्वर फुंडकर, उपाध्यक्ष राहुल राठी, संचालक दिपक मायी, राहुल गोयनका, शार्दूल दिगंबर तसेच बँकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापूजनानंतर आकर्षक श्री विठ्ठलाच्या मूर्तीचे दर्शन घेऊन सर्वांनी समाजात सुख, समृद्धी, आरोग्य आणि सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना केली. यानिमित्त प्रशासकीय कार्यालयात भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले.

# सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

४

शनिवार, दि. २५ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे राजीनाम्यासाठी डाव्या आघाडीची निदर्शने

## भाकप, माकप ,आयटक, सिटु सह विविध जन संघटनांचा उत्स्फूर्त सहभाग

प्रतिनिधी २५ जुलै




**अमरावती:** डाव्या आघाडीचे वतीने महाराष्ट्रामध्ये दिल्ली येथील विद्यार्थी आंदोलनावर पोलिसांनी अमानुष लाठी चार्ज केला. त्याचे निषेधार्थ डाव्या आघाडीच्या वतीने निदर्शने, महाराष्ट्र बंद या स्वरूपाचे आंदोलन पुकारले आहे. त्याचा भाग म्हणून भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, आयटक, सीटू या कामगार संघटनांसह विविध जन संघटनांच्या सहभागाने 23 जुलैला डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळ तीव्र निदर्शने करण्यात आली.

नीट परीक्षांचे पेपर फुटीचे परिणाम म्हणून 22 स्पर्धक विद्यार्थ्यांनी देशभरात आत्महत्या केल्यात. गेल्या दशकात वारंवार पेपर फुटतो. सरकार यावर गंभीर नाही .जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांचे शांततापूर्ण मार्गाने आंदोलन सुरू असतानाच जेष्ठ वैज्ञानिक सोनम वांगचुक यांनी आमरण उपोषण केले .त्यांना प्रतिसाद देण्याऐवजी त्यांना चुकीच्या पद्धतीने पोलिसांनी उचलून नेले. या निषेधार्थ केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामाचे मागणीसाठी 20 जुलैला देशभरातील युवाशक्तीचा संसद मार्च निघाला. या विद्यार्थी आंदोलनावर दिल्ली पोलिसांनी अमानुषपणे लाठीचार्ज केला. अश्रुधुराचे नळकांडे फोडले. यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी, विद्यार्थी गंभीर जखमी झाले.

आंदोलनकर्त्यांनी धर्मेंद्र प्रधान यांचे राजीनाम्यासह न्यायालयीन चौकशीची आणि दोषी प्रशासनावर तातडीने कारवाई करण्याची मागणी केलेली आहे.

सदर आंदोलनाचे नेतृत्व भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य कार्यकारणी सदस्य अशोक सोनारकर ,जिल्हा सहसचिव डॉ.ओमप्रकाश कुटेमाटे. अमरावती तालुका सचिव निळकंठ ढोके ,शहर सचिव सुनील घटाळे व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव रमेश सोनुले ,राज्य कौन्सिल सदस्य सुभाष पांडे ,राजेंद्र भांबोरे पद्माताई गजभिये यांनी केले.

सदर आंदोलनामध्ये जयेंद्र भोगे, जे एम कोठारी, लताताई सोनारकर अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. कैलास चव्हाण ,दिगंबर नगेकर,लक्ष्मण धाकडे ,अशोकराव राऊत ,सचिन लंगोटे ,उषाताई ढवळे, सुनील देशमुख, प्रतिभा मेश्राम, पंजाबराव शिंदे ,अश्विनी लोखंडे, प्रफुल्ल मंदा श्रीधर( महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती) दिलीप लाडे ,ज्योती नालट, वर्षा वानखेडे, वर्षा मेश्राम, लक्ष्मी नागदेवते ,लीना गवई ,सुषमा मोहोड, यांनी सहभाग नोंदवला.

# दिल्ली येथील विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठी हल्ल्याचा दर्यापूर वकील संघाच्या वतीने निषेध

## उपविभागीय अधिकारी यांना निवेदन



प्रतिनिधी २५ जुलै

**दर्यापूर :** दिल्ली येथील विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठी हल्ल्याचा दर्यापूर वकील संघाच्या वतीने निषेध करण्यात आला. या संदर्भात उपविभागीय अधिकारी हांडे यांना निवेदन देण्यात आले.

वकील संघ जिल्हा व सत्र न्यायालय दर्यापूर यांच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत राष्ट्रपती व प्रधानमंत्री यांना निवेदन पाठविण्यात आले. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा देऊन संबंधित यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. निट पेपर फुटीप्रकरणी तसेच इतर पेपर फुटीप्रकरणी भारताचे शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना जबाबदार धरण्यात यावे. तसेच शिक्षणमंत्री यांचे राजीनाम्याकरीता जंतर- मंतर नवी दिल्ली येथे विद्यार्थ्यांचे शांततामय आंदोलन चिरडण्याकरीता दिल्ली पोलीसांनी विद्यार्थ्यांवर केलेला अमानुष लाठीचार तसेच अश्रुधुराचा वापर करून निर्देयीपणे विद्यार्थ्यांना तसेच विद्यार्थी व त्यांचे पालकांना केलेले मारहाण करीता जबाबदार असलेल्या दिल्ली पोलीस यांची सखोल चौकशी करून त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी. तसेच त्यांनी भारतीय संविधानाच्या कलम १९ चे उल्लंघन केल्यामुळे त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

अशी मागणी दर्यापूर वकील संघांचे अध्यक्ष प्रदीप शेळके, जेष्ठ वकील विद्यासागर वानखडे, जगदीश विल्हेकर, देवानंद पर्वतकर, निशिकांत पाखरे,वैभव इंगळे, रितेश गवई, सचिन आठवले, संजय आठवले, सोप्निल बारबदे , एन. एस रायकर, संदीप मानकर, अनुराधा गोमासे, सम्राट चौरपगार, मुकुंद नळकांडे, कृपाली आठवले, श्रुतिका कोरडे, शिरीन परवीन मो. जमील, सुजता शिरसाट, भागेश्री कुंभारे, लीना गहेरवाल, सविता चव्हाण, आम्रपाली चौर पगार, हर्षद साखरे, एस. के. निकोरे आदी वकिलांची यावेळी उपस्थिती होती.

# पंढरपुर येथे जाणाऱ्या वारकऱ्यांच्या विशेष रेल्वे गाडीला हिरवी झेंडी

प्रतिनिधी २५ जुलै




**अमरावती :** महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेच्या, शेतकरी शेतमजुरांच्या सर्व वारकऱ्यांच्या घरात सुख समृद्धी येण्याकरिता वारकऱ्यांद्वारे विठ्ठलाच्या चरणी सुनिल राणा यांनी केली प्रार्थना

उपमहापौर सचिन भेंडे, गटनेते नाना आमले, नगरसेवक किशोर जाधव, नगरसेवक योगेश विजयकर, नगरसेविका सुमति ढोके, नगरसेविका रजनी डोंगरे, नगरसेविका अर्चना पांडे, स्विकृत नगरसेवक संजय हिंगासपुरे, प्रा.डॉ.अजय गाडे, हरिश चरपे, गंगाधरजी आवारे यांची प्रमुख उपस्थिती

YSP मार्गदर्शक सुनिल राणा व उपमहापौर सचिन भेंडे यांच्यासह YSP च्या सर्व नगरसेवकांनी पंढरपुर येथे जाणाऱ्या वारकऱ्यांना शाबुदाना खिचडीचे केले वाटप केले.आषाढी एकादशीच्या महापर्वानिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूर येथे विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या वारकऱ्यांच्या विशेष रेल्वे गाडीला युवा स्वाभिमान पक्षाचे (YSP) मार्गदर्शक सुनील राणा यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून उत्साहपूर्ण वातावरणात रवाना करण्यात आले. यावेळी संपूर्ण परिसर "जय हरी विठ्ठल... जय जय विठ्ठल..." या जयघोषाने दुमदुमून गेला.

याप्रसंगी सुनील राणा यांनी उपस्थित वारकऱ्यांना आषाढी एकादशीच्या शुभेच्छा देत, महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, शेतमजूर आणि सर्व वारकरी बांधवांच्या जीवनात सुख, शांती, समृद्धी व भरभराट नांदो, राज्यावर विठ्ठल-रुक्मिणीची कृपादृष्टी सदैव राहो, अशी प्रार्थना वारकऱ्यांमार्फत श्री विठ्ठलाच्या चरणी अर्पण केली.

यावेळी YSP मार्गदर्शक सुनील राणा, उपमहापौर सचिन भेंडे तसेच युवा स्वाभिमान पक्षाच्या सर्व नगरसेवकांच्या वतीने पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या वारकऱ्यांना प्रेमपूर्वक साबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात आले. उपवासासाठी पौष्टिक व आवश्यक आहार उपलब्ध करून देत वारकऱ्यांच्या सेवेत सहभागी होण्याचा हा उपक्रम भाविकांनीही मनापासून स्वागत केला.

या कार्यक्रमाला उपमहापौर सचिन भेंडे, गटनेते नाना आमले, नगरसेवक किशोर जाधव, नगरसेवक योगेश विजयकर, नगरसेविका सुमती ढोके, नगरसेविका रजनी डोंगरे, नगरसेविका अर्चना पांडे, स्वीकृत नगरसेवक संजय हिंगासपुरे, प्रा. डॉ. अजय गाडे, हरिश चरपे, गंगाधरजी आवारे यांच्यासह युवा स्वाभिमान पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने वारकरी उपस्थित होते.

# आ.संजय खोडके यांच्या हस्ते एस.टी.महामंडळाच्या एन.सी.एम.सी. स्मार्ट कार्डचे वाटप

## आदिवासी कॉलनी येथील एनसीएमसी कार्ड शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद

प्रतिनिधी २५ जुलै

**अमरावती:** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थातच (एस. टी.) प्रवाशांना डिजिटल व सुलभ सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या एनसीएमसी म्हणजेच नॅशनल कॉमन मोबाईलिटी कार्ड वितरण कार्यक्रमात विधान परिषद आमदार-संजयखोडकेयांच्याहस्ते लाभार्थ्यांना स्मार्ट कार्डचे वाटप करण्यातआले.

दिवंगतउपमुख्यमंत्रीलोकनेता -स्वअजितदादापवारयांच्याजयंती प्रित्यर्थ आयोजित सेवासप्ताह अंतर्गत आज शुक्रवार दिनांक २४ जुलै २०२६रोजीअमरावतीयेथील



विरांगणा राणी दुर्गावती सभागृह आदिवासीकॉलनीकॉंग्रेसनगररोड येथेएस.टीबससेवेचेएनसीएमसी कार्ड शिबिर घेण्यात आले. यावेळी प्रामुख्याने महिला व जेष्ठ नागरिक तसेच विद्यार्थी वर्गाची उपस्थिती दिसून आली. सर्वप्रथम दिवंगत उपमुख्यमंत्रीस्व.अजितदादापवार यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करूनकार्यक्रमालासुरुवातझाली. दरम्यानआमदारमहोदयांच्याहस्ते फीत कापून शिबिराचे उदघाटन करण्यातआले.

यावेळीआ.संजयखोडकेयांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधतांनासांगितलेकी,केंद्रवराज्य शासनाच्या डिजिटल उपक्रमांमुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक आधुनिक, पारदर्शक आणि प्रवाशांसाठी सोयीस्कर होत आहे. एनसीएमसी स्मार्ट कार्डच्यामाध्यमातूनप्रवाशांनारोख रकमेविना तिकीट व्यवहार करता येणारअसूनप्रवासअधिकसुरक्षित, जलद आणि सुलभ होणार आहे. या उपक्रमाला स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाला शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष यश खोडके, मनपा स्थायी समिती सभापती - अविनाश मार्डीकर, मनपा नगरसेवक - रतन डेंडूले, सामाजिक कार्यकर्ता राम चव्हाण, राजाभैय्या केबल, विशाल चव्हाण, नीलेश शर्मा, विशाल उर्फ बाळा तायडे यांच्यासह एस.टी. महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी, स्थानिक पदाधिकारी व नागरिक मोठ्यासंख्येनेउपस्थितहोते

# विशेष मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेला गती; प्रत्येक नगरसेवकाने शिबिरे आयोजित करावे – महापौर

## मतदानाचा हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी गणनापत्रक भरा; जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे आवाहन

प्रतिनिधी २५ जुलै

**अमरावती :** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रम (SIR) अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात मतदारयादीचे विशेष पुनरीक्षण सुरू असून, त्याच्या अंतिम टप्प्याच्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेत महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ रोजी दुपारी १ वाजता महानगरपालिका येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित बैठकीस मा.जिल्हाधिकारी आशिष येरेकर प्रमुख उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी आशिषयेरेकर यांनी सांगितले की, भारत निवडणूक आयोगामार्फत मतदारयादीचा विशेष पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत असून, याअंतर्गत नव्याने मतदारयादी तयार करण्यात येणार आहे. मतदारयादीत नाव कायम ठेवण्यासाठी २४ ते २६ जुलैदरम्यान विशेष मोहीम राबविण्यात येत असून, नागरिकांनी आपल्या मतदान केंद्रावर जाऊन गणनापत्रक भरून बीएलओकडे जमा करणे अत्यावश्यक आहे. त्यांनी सांगितले की, गणनापत्रक भरून न दिल्यास संबंधित मतदाराचे नाव आगामी प्रारूप मतदारयादीतून वगळले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्व मतदारांनी वेळेत गणनापत्रक जमा करून आपला मतदानाचा हक्क सुरक्षित ठेवावा. २४ ते २६ जुलै या कालावधीत दररोज सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सर्व विधानसभा मतदान केंद्रांवर विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. मतदारांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत ज्या मतदान केंद्रावर मतदान केले होते, त्याच केंद्रावर जाऊन बीएलओकडून गणनापत्रक घेऊन ते भरून त्वरित जमा करावे, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्ह्यातील सुमारे २५ लाख मतदारांपैकी १६ लाख मतदारांनी गणनापत्रक भरून दिले असून, अद्याप ९ लाख मतदारांनी गणनापत्रक जमा केलेले नाही. एकही पात्र मतदार मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहू नये, यासाठी सर्वांनी तातडीने या विशेष मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

यावेळी सुधारित मतदारयादी कार्यक्रमाची माहिती देताना त्यांनी सांगितले की, १ ऑक्टोबर २०२६ हा अर्हता दिनांक निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार ३० जून ते ८ ऑगस्टदरम्यान बीएलओमार्फत घरोघरी भेटी, ८ ऑगस्टपर्यंत मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना, १७ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदारयादी प्रसिद्धी, १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबरदरम्यान दावे व हरकती स्वीकारणे, १७ ऑगस्ट ते १५ ऑक्टोबरपर्यंत त्यावरील कार्यवाही आणि १९ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदारयादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

मतदारयादीतील दुबार नावे वगळणे, मयत व्यक्तींची नावे कमी करणे तसेच नवीन पात्र मतदारांचा समावेश करून अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत मतदारयादी तयार करणे हा या विशेष पुनरीक्षण मोहिमेचा उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध झाल्यानंतर प्रत्येक मतदाराने आपले नाव तपासून आवश्यक असल्यास १६ सप्टेंबरपर्यंत दावे अथवा हरकती दाखल कराव्यात. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी प्रत्येक मतदान केंद्रासाठी बूथ लेव्हल एजंट नियुक्त करून प्रशासनाला सहकार्य करावे, असेही त्यांनी आवाहन केले.

# मंत्री आदिती तटकरे यांचा दौरा

प्रतिनिधी २५ जुलै

**अमरावती :** महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे या शनिवार, दि. 25 जुलै रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

दौऱ्यानुसार, तटकरे ह्या दि. 25 जुलै रोजी भोकरबर्डी, धुळघाट रोड व कळमखार येथील अंगणवाडी केंद्रांना भेट देऊन बालकांशी व त्यांच्या पालकांशी संवाद साधतील. तसेच स्थानिक आदिवासी महिला बचत गटांच्या महिलांशी चर्चा करतील. दुपारी 1 वाजता धारणी येथील एनआरसी केंद्रास भेट देऊन कामकाजाची पाहणी करतील. त्यानंतर दुपारी 1.30 वाजता धारणी शासकीय विश्रामगृहात कुपोषण, बालमृत्यू आणि विविध स्थानिक समस्या व उपाययोजनांबाबत प्रशासकीय बैठक घेतील.

# मंगळवारपासून जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप क्रीडा स्पर्धा

प्रतिनिधी २५ जुलै

**अमरावती:** जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप क्रीडा स्पर्धा मंगळवारपासून आयोजित करण्यात आल्या आहे. मंगळवार, दि. 28 ते 31 जुलै दरम्यान विविध वयोगटाच्या स्पर्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धा अमरावती येथील जिल्हा परिषद सायन्सकोर मैदान आणि पोलिस ग्राऊंड येथे घेण्यात येणार आहे. जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सुब्रतो मुखर्जी स्पोर्ट्स एज्युकेशन सोसायटी, नवी दिल्लीच्या वतीने 2026-27 या वर्षात आयोजित करण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय सुब्रतो फुटबॉल कप, सबज्युनियर मुले, ज्युनिअर मुले, मुली क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूकरीता सबज्युनिअर 15 वर्षाआतील मुले क्रीडा स्पर्धेसाठी मुले वयोगटात दि. 1 जानेवारी 2012 रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. तसेच ज्युनिअर 17 मुले, मुली वयोगटासाठी दि. 1 जानेवारी 2010 रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप सबज्युनिअर, ज्युनिअर क्रीडा स्पर्धेत सहभागी सर्व संघानी जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागापूर्वीच subrotocup.in/register या संकेतस्थळावर खेळाडू आणि संघानी नोंदणी करावी. सहभागी होणाऱ्या संघांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात ऑफलाईन नोंदणी केली आहे.

# विभागात मतदार याद्यांच्या 'विशेष सखोल पुनरीक्षण' मोहिमेचे सुधारित वेळापत्रक जाहीर

## ३० जून ते ८ ऑगस्ट दरम्यान 'बीएलओ' करणार घरोघरी जाऊन पाहणी

प्रतिनिधी २५ जुलै

**अमरावती:** राज्यातील विधानसभा मतदारसंघांच्या मतदार याद्या संपूर्णपणे अद्ययावत, अचूक आणि दोषविरहित करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार 'विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) २०२६' ही विशेष मोहीम राबवली जात आहे. वाढते नागरीकरण, मतदारांचे होणारे स्थलांतर, दुबार नोंदी आणि मृत मतदारांची नावे यामुळे मतदार याद्या दुरुस्त करणे अत्यंत गरजेचे बनले असून, या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांच्या वतीने या मोहिमेचे सुधारित वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आलेआहे.यानव्याकार्यक्रमानुसार अमरावतीविभागातीलसर्वजिल्हा प्रशासन व निवडणूक यंत्रणांना अंमलबजावणीचे कडक निर्देश देण्यात आले आहेत. सुधारित वेळापत्रकानुसार, ३० जून ते ८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) प्रत्यक्ष मतदारांच्या घरी जाऊन गणना प्रपत्र भरून घेतील. यानंतर ८ ऑगस्टपर्यंत मतदान केंद्रांची पुनर्रचना आणि सुसूत्रीकरणाचे काम पूर्ण केले जाईल. या प्रक्रियेनंतर १७ ऑगस्ट २०२६ (सोमवार) रोजी मतदार याद्यांची प्रारूप प्रसिद्ध केले जाईल. १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर दरम्यान नागरिकांना मतदार यादीबाबत आपलेदावेवहरकतीदाखलकरता येतील, तर १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत या सर्व हरकतींचा निपटारा केला जाईल. अखेर १९ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी अधिकृतपणे प्रसिद्ध केली जाणार आहे. गृहभेटीदरम्यान 'बीएलओ' अधिकाऱ्यांकडून मतदारांची सध्याचीमाहिती,सन२००२-२००४ च्या मागील SIR यादीशी स्वतःची किंवा नातेवाईकांची जुळवणी), जन्मतारीख,मोबाईलक्रमांकआणि ऐच्छिक आधार क्रमांक नोंदवला जाईल.

# पाऊले चालती पंढरीची वाट...!

## अकोली रेल्वे स्थानकावरून शेकडो वारकऱ्यांचे पंढरपूरकडे प्रस्थान

प्रतिनिधी २५ जुलै

**अमरावती :** आषाढी एकादशीनिमित्त श्री. विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे निघालेल्या शेकडो वारकऱ्यांच्या भक्तिमय उत्साहाने आज नया अकोली रेल्वे स्थानक परिसर दुमदुमून गेला. विठ्ठल नामाच्या अखंड जयघोषात आणि टाळ-मृदंगाच्या निनादात पंढरपूर विशेष रेल्वेचे प्रस्थान झाले.



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येत असलेल्या सेवा दशक उपक्रमाअंतर्गत आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्या वतीने पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना जेवणाचे डबे, उपयोगी किट तसेच आवश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी त्यांच्यावतीने रेल्वेला हिरवी झेंडी दाखवून वारकऱ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

स्थानकावर सकाळपासूनच वारकरी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. विठ्ठलभक्तांच्या जयघोषाने आणि भक्तिरसाने संपूर्ण परिसर भारावून गेला होता. प्रवासाच्या सुरुवातीलाच टाळ-मृदंग, विठ्ठल भजने आणि "ज्ञानेश्वर माऊली", "तुकाराम" यांच्या जयघोषात वारकऱ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. वारकऱ्यांचे अत्यंत आत्मीयतेने स्वागत करून त्यांची सेवा केली. या आपुलकीच्या आदरातिथ्यामुळे वारकरी भाविक भारावून गेले.

यावेळी ज्येष्ठ वारकऱ्यांचा आ. प्रवीण पोटे पाटील, आ. राजेश वानखडे, जयंत डेहनकर, शिवराय कुळकर्णी , श्रीचंद तेजवानी आणि तुषार भारतीय यांच्या हस्ते शाल देऊन विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी वारकऱ्यांना सुखरूप प्रवास व विठ्ठलाच्या दर्शनासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास आ. प्रवीण पोटे पाटील, आ. राजेश वानखडे, महापौर श्रीचंद तेजवानी, तुषार भारतीय, चेतन गावंडे, शिवराय कुळकर्णी, जयंत डेहनकर, चेतन पवार, श्रेयस पोटे पाटील, आशिष अतकरे, नितीन गुडधे, लता देशमुख, राधा कुरिल, भारती गुहे, डॉ. कंवल पांडे, प्रवीण वैश्य, विनोद ठोसर, सुधा तिवारी, लविना हर्षे, सुनंदा खरड, प्रशांत शेगोकार, बलदेव बजाज, ऋषिकेश देशमुख यांच्यासह भाजप महिला मोर्चा, युवा मोर्चाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. सेवा, श्रद्धा आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या उपक्रमामुळे वारकऱ्यांच्या वारीला सेवाभावाची जोड मिळाली. विठ्ठलभक्तांच्या सेवेसाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे वारकरी व नागरिकांनी मनापासून स्वागत केले.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ख्रिस्त कॉलनी, ट्रेझरी ऑफिस नजीक, प्रफुल घवळे यांची बिल्डिंग अमरावती, C/0 गॅलक्सी बार जवळ येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A2977 , RRC Helpline No. 8484842135